# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Sociology

## Assignment

## Session: 2019 – 2020

classmate
Date
Page

1st seomestor

Name :-) suchita Ashok Fulmali

sub :-) Sociolouy

college :-) yashoda girls Arts & commerce college Nagpur

2019 - 2020

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Suah Nagar, Nagpur-15

डॉ० प्रकाश सोनक

SEAL
Yashoda Girls Arts & Commerce College
Nagpur

# सामाजिक संस्था [Institution]

* संस्थेचा अर्थ :=

आपण दररोजच्या व्यवहारात 'संस्था' हा शब्द वापरत असतो. 'संस्था' हा शब्द आपल्या परिचयाचा आहे. वेगवेगळ्या अर्थात 'संस्था' हा शब्द उपयोगात आणल्या जातो. परंतु समाजशास्त्रीयदृष्ट्या 'सामाजिक संस्था' या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. सामाजिक संस्था ही एक समाजशास्त्रीय संकल्पना असल्यामुळे समाजशास्त्रात 'संस्था' या शब्दाचा एक विशिष्ट अर्थ आहे. मानवाच्या काही मुलभुत गरजा आहेत. सामाजिक जीवन व्यवस्थितरित्या पार पाडण्याकरिता या गरजा पुर्ण करण्याच्या दृष्टीने केवळ एक व्यक्ति प्रयत्न करीत नाही. तर समाजातील सर्वच सदस्य प्रयत्न करीत असतात. त्यामुळे समाजाच्या या सर्व सदस्यांच्या आवश्यक गरजांची पुर्तता होणे महत्वाचे असते. म्हणुन व्यक्तिने कोणत्या प्रकारचे वर्तन करावे याबाबत काही नियम असतात. या नियमांचे व्यक्तिकडुन पालन होते किंवा नाही. हे देखील बघितल्या जाते. यातुनच समाजात सुसंघटित वर्तन प्रकार निर्माण होतात.

* समाजाच्या मुलभुत गरजांची पुर्तता करण्यावर समाज व्यवस्थेचे अस्तित्व आणि सातत्य अवलंबुन असते. लैंगिक गरजांची पुर्ती करणे, मुलांचे संगोपण आणि संवर्धन

करण्यासाठी समाजमान्य प्रमाणकांच्या अवलंब केला जातो अशा प्रमाणकांच्या प्रतिमानास संस्था असे म्हणतात कुटुंब, विवाह, धर्म, राज्य अर्थ आणि शिक्षण ही सामाजिक संस्थाची उदाहरणे होत.

* सामाजिक शास्त्राचे स्वरूप हे सार्वजनिक आहे कारण प्रत्येक समाजात संस्था आढळून येतात समाजशास्त्रीयदृष्ट्या 'सामाजिक संस्था' या संकल्पनेचा कोणता अर्थ समाजशास्त्रज्ञांना अभिप्रेत आहे. हे लक्षात घेण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक संस्थाबाबत मांडलेल्या विचार करणे आवश्यक आहे.

* संस्थेची व्याख्या [Definition]

1) बोगार्डस [Bogardus] :- "प्रामुख्याने ~~सुव्य~~ सुव्यवस्थित कार्यसमितीच्या माध्यमातून लोकांच्या आवश्यक गरजांची पूर्ती करण्यासाठी संघटित केलेली समाजाची संरचना म्हणजेच सामाजिक संस्था होय.

2) हॅरि जॉनसन [Harry Johnson] :- "सामाजिक संस्था म्हणजे मान्यता प्राप्त प्रमाणकांचे प्रतिमान होय.

3) किंग्जले डेव्हिस [Kingsley Davis] :- एक किंवा अनेक कार्यांच्या पूर्तीसाठी निर्माण केलेल्या परस्परसंबंधित अशा लोकाचार, रूढी, आणि कायद्याच्या संच्यास

classmate
Date
Page

4) ऑगबर्न व निमकॉफ [Ogburn and Nimkoff]
"मानवाच्या मूलभूत गरजांच्या पुर्तीसाठी संघटित व प्रस्थापित मार्गाला सामाजिक संस्था म्हणतात."

* संस्थेची आवश्यक तत्वे किंवा वैशिष्ट्ये :-)
1) निश्चित उद्देश :-)
मानवाच्या अनेक गरजा आहेत. या विविध गरजांची पुर्तता करण्यासाठी सामाजिक संस्थाची निर्मिती झाली आहे. प्रत्येक सामाजिक संस्थाचे विशिष्ट्य उद्देश असतात. या विशिष्ट उद्देशांची पुर्ती सामाजिक संस्थाद्वारे केली जाते.
उदा :- आर्थिक उद्दिष्ट्यांची पुर्ती करण्यासाठी आर्थिक संस्थेची निर्मिती करण्यात आली. तर लैंगिक गरजाच्या पुर्तीसाठी विवाहसंस्था अस्तित्वात आली. म्हणुन निश्चित उद्दिष्ट हे सामाजिक संस्थेचे एक महत्वाचे वैशिष्ट आहे.

2) विशिष्ट कार्यप्रणाली आणि संरचना :-)
सामाजिक संस्थेची काही नियम असतात. तसेच कार्यप्रणाली आणि व्यवस्था असते. ज्यामुळे संस्थेचे कार्य सुरळीतपणे सुरू राहते. आणि संस्था टिकुन राहते. म्हणजे संस्थेची एक विशिष्ट कार्यप्रणाली आणि संरचना असते.

3) प्रतिक :=)

प्रत्येक सामाजिक संस्थांची विशिष्ट प्रकारची प्रतिके असतात. ही प्रतिके भौतिक किंवा अभौतिक अशा दोन्ही प्रकारची असतात प्रतिके ही सामूहिक जाणीवेची भावना, निष्ठा, आकर्षण, इत्यादी गोष्टी संस्थेच्या सदस्यांमध्ये निर्माण करतात.

उदा :=) राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज इत्यादी राज्य-संस्थेची प्रतिके होत. या प्रतिकांवरून सामाजिक संस्थेची ओळख होते.

4) सापेक्ष स्थायित्व :=)

मानवाच्या गरजांची पूर्ती करण्याकरीता सामाजिक संस्थांची निर्मिती झालेली असते. मानवी गरजा या परिस्थिती किंवा वातावरणाशी संबंधित असतात. गरजांच्या पूर्तिच्या दृष्टीने समाजाने स्वीकृत केलेल्या प्रमाणकांच्या चौकटीतच व्यक्ती कार्य करीत असते. म्हणजेच संस्थेत प्रमाणकाचे प्रतिमान असते. हे प्रमाणकांचे प्रतिमान सापेक्षतः स्थिर असते. जेव्हा परिस्थिती आणि गरजांमध्ये परिवर्तन होते. तेव्हा प्रमाणकांमध्ये बदल होतो. आणि परिणामी सामाजिक संस्थेत बदल घडून येतो.

5) भूमिकांची संरचना :

प्रत्येक सामाजिक संस्थेमध्ये संबंधित भूमिकांची संरचना असते. ही भूमिकांची

निर्धारित भूमिकांची संरचना असते. ही भूमिकांची संरचना समाजाच्या सामान्य मूल्यां. द्वारे निर्धारित केलेली असते.
उदा :- विवाह, कुटुंब, आर्थिक धार्मिक इत्यादी सामाजिक संस्थामध्ये विविध प्रकारच्या भूमिका आहेत व्यक्ती आपल्या भूमिका प्रमाणकांनुसार पार पाडतात. म्हणून सामाजिक संस्थेचे कार्य सुरळीतपणे चालते.

* सांस्कृतिक साधणे :-

मानवाच्या गरजांच्या पुर्तीसाठी संस्थेची निर्मिती झालेली असते. त्यामुळे त्या गरजांच्या पुर्तीसाठी आवश्यक असणाऱ्या साधनांचा वापर संस्था करीत असते.
उदा :- कुटुंबासाठी उपयोगी असणाऱ्या वस्तु, भांडी ही कुटुंबसंस्थेची उपयुक्त साधने होत. तर देऊळ, विहार, स्तुप, चर्च, मशीद ही धर्मसंस्थेची उपयुक्त अशी सांस्कृतिक साधने आहेत.

## द्वितीयक किंवा दुय्यम समूह
## [Secondary Groups]

1) व्यक्तिमत्वाचे विशेषीकरण :-

दुय्यम समुदायाद्वारे व्यक्तिमत्वाचे विशेषीकरण केले जाते. समाज आणि संस्कृतीचा विकास होतो. सामाजिक जिवनाच्या विभिन्न क्षेत्रांमध्ये श्रम विभाजन होते. वेगवेगळ्या कार्याकरीता वेगवेगळ्या दुय्यम समुहाची निर्मिती होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला एका विशेष कार्यामध्ये योग्य आणि कुशल बनण्याची संधी मिळते.

2) सामाजिक आदान-प्रदानाचे क्षेत्र विस्तृत होते :-

सभ्यतेच्या विकासाबरोबर मानवाच्या गरजांमध्ये खुप वाढ झाली आहे. आणि या गरजांची पुर्ती केवळ प्राथमिक समुहाद्वारे होणे शक्य नाही. त्याकरीता महाविद्यालय, कॉर्पोरेशन, मंदिर किंवा राज्य इत्यादी दुय्यम समुहाची आवश्यकता असते. दुय्यम समूह हे जगाशी आपले संबंध प्रस्थापित करण्यास मदत करतात. त्यामुळे सामाजिक आदान-प्रदानाचे क्षेत्र खुप विस्तृत झाले आहे.

3) सभ्यतेचा विकास आणि सामाजिक परिवर्तनास सहाय्यक :-

दुय्यम समुहामध्ये मोठ्या प्रमाणात कार्य होत असते. त्यामध्ये विशेषज्ञ असतात. जगातील अत्यंत महत्वपुर्ण शोध हे या समुहाद्वारेच समुहाद्वारेच लावल्या गेलेत. त्यामुळे व्यक्तीकडे

परिवर्तन लवकर घडून येते.
उदा :- शहरांमध्ये दुय्यम समूह जास्त असतात कारण ते अधिक प्रगतीशील आणि परिवर्तनशील असतात.

5) कार्य आणि व्यवहारांवर नियंत्रण :-
आधुनिक काळातील समुदाय हे आकाराने मोठे असतात. आणि त्यामध्ये विभिन्न वर्ग, जाती संप्रदायाचे लोक असतात. हे सर्व लोक आपल्या स्वार्थाच्या पुर्तीकरीता आपसात स्पर्धा करतात त्यांच्या व्यवहारावर प्रथा, परंपरा शेजार इत्यादी प्राथमिक साधनांद्वारा नियंत्रण ठेवले जाते.

*प्राथमिक आणि द्वितीयक समूहातील फरक*

| प्राथमिक समूह | द्वितीयक समूह |
|---|---|
| 1) प्राथमिक समूहाचा आकार लहान असतो | 1) द्वितीयक समूहाचा आकार मोठा असतो. |
| 2) प्राथमिक समूहातील सदस्यांचा संपर्क प्रत्यक्ष असून त्यांचे संबंध घनिष्ट व व्यक्तिगत असतात. | 2) द्वितीयक समूहातील सदस्यांमधील संबंध हे दुय्यम अप्रत्यक्ष आणि अवैयक्तिक असतात. |
| 3) प्राथमिक समूहातील | 3) द्वितीयक समूहातील |

| | |
|---|---|
| संबंधाचा काळ हा प्रदीर्घ असतो. | अल्प कालावधी करीता असतात. |
| 4) प्राथमिक समूह हे कोणत्याही विशिष्ट हिताच्या किंवा स्वार्थाच्या पुर्ती करिता नसतात. | 4) द्वितीयक समूह हे विशेष उद्दीष्टासाठी असतात. या समूहांची निर्मिती ही विशिष्ट उद्दे उद्देशाच्या पुर्तीसाठी झालेली असते. |
| 5) प्राथमिक समूहातील सदस्यांचे संबंध प्रत्यक्ष असतात. त्यांच्यात शारीरिक निकटता असते. | 5) द्वितीयक समूहातील सदस्यांचे संबंध हे अप्रत्यक्ष असतात. त्यांच्यात शारीरीक निकटता आढळत नाही. |
| 6) प्राथमिक समूहाचा जन्म स्वतःहा होतो. | 6) द्वितीयक समूह हे जाणुन-बुजुन निर्माण केले जातात. उद्देशाच्या पुर्तीसाठी हे समूह निर्माण केले जातात. |
| 7) प्राथमिक समूह हे अनौपचारिक असतात. आपल्या सदस्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा कायद्याचे बंधन नसते. सदस्याचे दायित्व असीमीत | 7) द्वितीयक समूहातील सदस्यांचे दायित्व हे सिमित असते. द्वितीयक समूह औपचारिक असतात. आपल्या सदस्यावर कायदे नियम याद्वारा नियम |

| | |
|---|---|
| 8) प्राथमिक समूह आपल्या सदस्यावर तिरस्कार, निंदा व्यक्तिगत प्रभाव इत्यादी साधनाद्वारा नियंत्रण ठेवतो. | 8) द्वितीयक समूहात आपल्या सदस्यांवर कायदे, पोलीस यंत्रणा, कोर्ट, सेना या द्वितीयक साधनाद्वारे नियंत्रण ठेवल्या जाते. |
| 9) प्राथमिक समूह हे सार्वभौमिक असतात. हे जगातील प्रत्येक समाज आणि संस्कृतीच्या विकासाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये आढळतात. | 9) द्वितीयक समूह हे सार्वभौमिक नसतात. उदा:- साम्यवादी संघटन हे प्रत्येक देशामध्ये आढळून येत नाही. |
| 10) प्राथमिक समूह हे व्यक्ती-चा स्वभाव आणि आद-र्शांच्या निर्मिती साठी महत्वाचे असतात. | 10) द्वितीयक समूह हे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वास विशेषीकरण प्रदान करतात. |
| 11) प्राथमीक समूहाची सदस्यता व्यक्ती आपल्या जीवनाचे एक अनीवार्य अंग समजते. | 11) द्वितीयक समूहाचे सदस्यत्व हे विशेष आवश्यकता पडली तरच स्वीकारले जाते. |

classmate
Date ____
Page ____

# * संदर्भ समूह [Group Theory]

अर्थ :-)

संदर्भ समूहाची संकल्पना सर्वप्रथम एच. डाय. हर्समेन यांनी 1942 मध्ये मांडली हर्समेनच्या मते 'समाजातील व्यक्ती इतरांच्या वर्तनाला आधारभूत मानून किंवा आदर्श मानून त्यांचे अनुकरण करतात. याचाच अर्थ व्यक्ती आपल्या वर्तनाकरीता दुसऱ्यांच्या वर्तनाचा आधार किंवा संदर्भ घेतात. आणि त्यानुसार ते आपले वर्तन करतात. म्हणून संदर्भ समूह ही संकल्पना व्यक्तीचे मूल्यांकन करण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. या संकल्पनेचा संबंध व्यक्तीच्या मानसिक आयामाशी आहे. सदस्यांच्या वर्तनाचा मानसिक आधार स्पष्ट करण्यासाठी संदर्भ समूहाचे विश्लेषण अतिशय महत्वाचे आहे.

* टर्नर, मर्टन आणि शेरीफ यांनी संदर्भ समूह सिद्धांताचे सविस्तर विश्लेषण केले. व्यक्तीचे वर्तन निर्धारण आणि मूल्यांकन करण्यासाठी ज्या समूहाचा संदर्भ घेतला जातो. त्याला संदर्भ समूह असे म्हणतात. अशा समूहाला अभिमुख असणारे व्यक्तीचे वर्तन म्हणजे संदर्भ समूह वर्तन होय. व्यक्ती वर्तनाच्या संदर्भात समूह संदर्भ महत्वाचा असतो. संदर्भ समूह लक्षात घेऊनच व्यक्तीच्या वर्तनाचे समूहाच्या संदर्भात मूल्यांकन करता येते. संदर्भ समूहाची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी दोन प्रकारच्या समूहाचा उल्लेख करता येतो. सदस्यता आणि संदर्भ या आधारावर समूहाचे पुढील दोन

अ सादस्यता समुह :-)

व्यक्ती कोणत्याही तरी समुहाचा सदस्य असतो. व्यक्ती ज्या समुहाचा सदस्य असतो तो समुह म्हणजे सादस्यता समुह होय. व्यक्ती ज्या समुहाचा सदस्य असतो त्या समुहास तो आपला समुह मानुन त्या समुहाच्या प्रकार्यात सक्रीय सहभाग घेते.

ब :-) संदर्भ समुह :-) व्यक्ती संदर्भ समुहाची सदस्य नसते तो व्यक्तीचा आपला समुह नसतो. परंतु व्यक्ती दुसऱ्या कोणत्यातरी समुहाशी आपला संबंध प्रस्थापित करीत असते. अशा बाहेरच्या समुहाचे आदर्श, मुल्य, प्रमाणके आधारभुत मानुन व्यक्ती आपल्या वर्तनात सम्मीलीत करते अशा समुहास संदर्भ समुह असे म्हणतात;

व्याख्या :-)

1) मर्टन आणि केल्वर :-) "ज्या समुहांचा आपण संदर्भ घेतो परंतु आपण कधीही सदस्य नसतो. अशा समुहास संदर्भ समुह असे म्हणतात."

2) चॅलेस आणि वॅलेस :-) "एखादी व्यक्ती स्वतः चे मुल्यांकन करण्यासाठी ज्या समुहाचा संदर्भ घेत त्यास संदर्भ समुह म्हणतात.

3) विल्यम स्कॉट :-) "आपल्या दृष्टी अभिवृत्ती आणि मुल्ये यांची व्याख्या करण्यासाठी आणि आपल्या वर्तनाला दिशा देण्यासाठी व्यक्ती ज्या समुहाच्या किंवा सामाजिक वर्गाचा उपयोग करते त्यास संदर्भ

१) आर के मर्टन :-) "संदर्भ समूह सिद्धांताचा उद्देश अशा स्थितीस किंवा परिस्थितीस व्यवस्थित करणे होय. की ज्या संदर्भात आपल्या वर्तनाचे मूल्यांकन करताना व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींच्या किंवा समूहाच्या मूल्यांचा तुलनात्मक संदर्भ आधार म्हणून घेतो. आणि आपल्या वर्तनाचे निर्धारण करतो.

## * संदर्भ समूहाचे वैशिष्ट्ये *

१) आकांक्षीत संदर्भ समूह :-) अनेकदा संदर्भ समूह हा व्यक्तीचा आकांक्षीत संदर्भ समूह असतो. व्यक्ती हा संदर्भ समूहाची सदस्य नसते. परंतु त्याचे सदस्यत्व मिळावे. अशी इच्छा व्यक्तीच्या मनात असते.

उदा:-) एम.ए चे शिक्षण घेणारा विद्यार्थी प्राध्यापक होण्याची आकांक्षा बाळगत असेल तर त्याच्या दृष्टीने प्राध्यापकांचा समूह हा आकांक्षीत समूह ठरतो. आकांक्षीत संदर्भ समूहाचे सदस्यत्व मिळविण्यासाठी व्यक्तीला सहज प्राप्त होत नाही. त्याकरीता काही अटी अनिवार्य असतात.

२) अंतर्गत समूह :-) व्यक्तीचा जो संदर्भ समूह असतो. तो समूह तिचा स्वतःचा समूह असतो. याचाच अर्थ व्यक्ती संदर्भ समूहाची सदस्य असते. व्यक्तीच्या दृष्टीने तो समूह तीचा असून अंतर्गत असतो.

classmate

Date ______
Page ______

3) आदर्श समूह :-)

व्यक्तीच्या दृष्टीने तिचा संदर्भ समूह हा आदर्श समूह असतो. त्या समूहातील सदस्यांचे वर्तनप्रकार, नियमने, मूल्ये, अभिवृत्ती मूल्यमापनासाठी मानदंड किंवा निकष म्हणून वापरत असतो. व्यक्ती संदर्भ समूहातील सदस्यांशी तुलना करून आपल्या आचार-विचारांचे आणि यशापयशाचे मूल्यमापन करीत असते. डेव्हिड इसलर यांच्यामते आपल्या यशापयशाचे मोजमाप करण्यासाठी आपण आपली ज्या समूहातील लोकांशी तुलना करतो, त्यांना संदर्भ समूह म्हणतात.

4) अनुकरण :-)

अनेकदा व्यक्ती आपल्या संदर्भ समूहातील लोकांचे वर्तनप्रकार, नियमने, मूल्ये अभिवृत्ती आदर्श मानून आणि त्या गोष्टींचे अनुकरण त्या समूहाचे संदर्भ होण्यासाठी प्रयत्न करतात. एम.एन. श्रीनिवास यांनी मांडलेल्या संस्कृतीकरण या प्रक्रियेत कनिष्ठ जातीमधील लोक वरिष्ठ जातीच्या लोकांचे अनुकरण करतात. चित्रपटातील अभिनेता आणि अभिनेत्री यांच्या वेशभूषा, केशभूषा बोलणे, चालणे इत्यादींचे सिनेशौकीन तरुण-तरुणी अनुकरण करतात. कारण अभिनेता आणि अभिनेत्री यांचा समूह त्यांच्या दृष्टीने संदर्भ समूह असतो.

5) तादात्मीकरण :-)

आदर्श असलेल्या संदर्भ समूहाशी

classmate
Date
Page

समुहाचे सदस्य प्राप्त करण्याची इच्छा असेलच असे नाही. तरिदेखील व्यक्ती त्या समुहाचे सदस्यत्व प्राप्त करण्याची इच्छा असेलच असे नाही. तरीदेखील व्यक्ती त्या समुहाशी तादात्म्य होते. शरीफ यांच्यामते संदर्भ समुह ही व्यक्तीची केवळ कल्पनाही असु शकते.

5) वास्तविक किंवा काल्पनिक समुह :-)

हेन्री जॉन्सन यांच्यामते संदर्भ समुह हा वास्तविक किंवा काल्पनिक यापैकी असु शकतो. म्हणजेच व्यक्ती ज्याला आपला समुह मानतो. तो सध्दा व्यवहारात अस्तित्वात असु शकतो. किंवा तो तसा अस्तित्वास नसु शकतो. संदर्भ समुह ही व्यक्तीची केवळ कल्पनाही असु शकते.

7) सामाजिक स्वर्ग :-)

संदर्भ समुह या संज्ञेत समुह हा शब्द असला तरी तो ज्येकपेक्षी अनेकांच्या सामाजिक वर्ग असेलच असे नाही. एखादा सामाजिक स्वर्गदेखील संदर्भसमुह असु शकतो.
उदा :- डॉक्टर्स, वकील, प्राध्यापक, इंजिनियर्स इत्यादी सामाजिक स्वर्ग असुन एखादी व्यक्ती या स्वर्गाला आपला संदर्भ समुह मानु शकतो.

8) सकारात्मक व नकारात्मक समुह :-)

मर्टनच्यामते, संदर्भ समुह हा सकारात्मक आणि नकारात्मक या दोन्ही प्रकारचा असु शकतो. व्यक्ती ज्या समुहातील वर्तनप्रकार, नियमने, सदस्य

व्यक्तीकरिता सकारात्मक समूह ठरतो. तर कोणते वर्तनप्रकार, नियमने, मूल्ये, आणि अभिवृत्ती नाकारल्यात हे ठरविण्यासाठी ज्या समूहाचा संदर्भ घेतल्या जातो. तो नकारात्मक संदर्भ समूह ठरतो.

(उदा:-) उत्साही विद्यार्थी वाईट मुलांपासून स्वत:ला दूर ठेवतो आणि त्यांच्यासारखे वर्तन करण्याचे नाकारतो तेव्हा तो समूह त्या ~~विद्यार्थ्यांकर~~ विद्यार्थ्यांकरिता नकारात्मक समूह ठरतो.

## * संदर्भ समूहाचे प्रकार *

## [Types of Reference Group]

1) सदस्यता समूह संदर्भ समूहाच्या रूपात :-)

अनेकदा व्यक्ती आपल्या समूहाच्या अशा दुसऱ्या व्यक्तीच्या उपसमूहास आपला संदर्भ मानतो की, ज्याचे कर्तृत्व अधिक आहे म्हणजेच जे जीवनात अधिक यशस्वी झालेले. उदा:- आपल्याच समूहातील ज्या सैनिकाला वीरता पुरस्कार मिळाले आहे. त्यांना संदर्भ रूप समूहाच्या स्वरूपात स्विकारले जाते.

सदस्यता समूहाचे पुढील तीन प्रकार आहेत.

अ :-) नाममात्र सदस्य :-)

हे समूहाचे अशाप्रकारचे समूह असतात. की ज्यात समूहातील कार्य सदस्याबाबतच्या अटी पूर्ण केल्यात परंतु ते अशा समूहाचे सक्रीय सदस्य नसतात.

ब परिघात्मक सदस्यता समूह :- अशा प्रकारचे समूह असतात. की ज्यात समूहातील ते उपसमूह असतात. व्यक्ती आपल्या समूहाच्या कार्यक्रमात व्यक्तीचा सहभाग अत्यंत कमी प्रमाणात असतो.

क सदस्यता समूह आणि उपसमूह :- व्यक्ती ज्या समूहाची सदस्य असते. अशा समूहातील ते उपसमूह असतात. व्यक्ती आपल्या उपसमूहाचे निर्धारण करतांना ती ज्या उपसमूहाची सदस्य आहे. त्या उपसमूहाचा विचार करते.

२) सकारात्मक आणि नकारात्मक समूह :-

मर्टनच्या मते, संदर्भ समूह हे सकारात्मक आणि नकारात्मक या दोन्ही प्रकारचे असू शकतात. ज्या समूहाच्या प्रमाणक आणि मुल्यांमुळे व्यक्तीचे वर्तन अभिमुख झालेले असते. अशा समूहाच्या सकारात्मक समूह म्हणून उल्लेख करता येतो. आणि याउलट असणारा समूह म्हणजे नकारात्मक समूह मानला जातो. व्यक्ती आपल्या वर्तनाकरिता अशा समूहाची निवड करू शकतो. की ज्याच्या प्रभाव नकारात्मक होऊ शकतो. संदर्भ समूह हा सकारात्मक किंवा नकारात्मक राहील हे स्थिती आणि कालसापेक्ष असते.

३) प्रकार्यात्मक संदर्भ समूह :-

मर्टनने प्रकार्यात्मक समूह प्रकाराचे तीन प्रकार सांगितले आहेत.

1) आदर्शात्मक संदर्भ समूह :-

निर्धारण ज्या समूहाच्या आदर्शाच्या संदर्भातच होते. त्याच्या आदर्शात्मक संदर्भ समूह म्हणून विचार करण्यात आला आहे.

2) तुलनात्मक संदर्भ समूह :-) व्यक्ती आपल्या वर्तनाची तुलना ज्या समूहातील आदर्शाच्या संदर्भात करतो. त्याला तुलनात्मक संदर्भ समूह असे म्हणतात.

3) आंतरक्रिया समूह :-) व्यक्तीच्या वर्तनाचे निर्धारण इतर व्यक्तींच्या घटनांच्या पारस्परिक क्रियेद्वारे होत असते. म्हणून अशा आंतरक्रिया समूहाचा संदर्भ समूह म्हणून विचार करण्यात आला.

4) बहुल संदर्भ समूह :-)

बहुल संदर्भ समूह प्रकारात मर्टनने दोन संदर्भ समूहाचा समावेश केला आहे.

अ) परस्पर विरोधी संदर्भ समूह :-)

कधी-कधी व्यक्तीच्या जीवनात निरंतरपणे कार्यरत असतात परस्पर विरोधी संदर्भ समूह येतात. अशावेळी व्यक्तीपुढे प्रश्न निर्माण होतो. की कोणत्या समूहाला आदर्श वर्तनाकरीता आधारभूत मानायचे अशा समूहाची निवड परिस्थिती सापेक्ष असते.

ब) निरंतर संपर्क साधणारे संदर्भ समूह :-)

काही संदर्भ समूह व्यक्तीच्या जीवनात निरंतरपणे संपर्क कार्यरत असतात. अशावेळी व्यक्तीपुढे प्रश्न निर्माण होतो. की कोणत्या समूहाला आदर्श वर्तनाकरीता आधारभूत मानायचे.

स्तर किंवा व्यवसाय हे असे स्पष्ट समूह आहेत. ज्यांच्यासोबत व्यक्तीची निरंतर आंतरक्रिया घडत असते आणि त्यातून व्यक्तीच्या अभिरुची आणि जीवन-दृष्टिकोनाची अभिव्यक्ती होत असते. म्हणून व्यक्ती अशा समूहाला आपला संदर्भ मानतो.

5) विशिष्ट व्यक्तींचा संदर्भ समूह :-)

प्रत्येक व्यक्तीपुढे दुसऱ्या काही प्रतिष्ठीत मानल्या जाणाऱ्या लोकांची प्रतिमा किंवा आदर्श असतो. त्यांना व्यक्ती आपला आदर्श मानतो. आणि त्यांच्याशी एकरूप होऊन त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न करतो. अशा आदर्श आणि प्रतिष्ठित व्यक्तीमध्ये व्यक्ती आपली प्रतिमा बघतो आणि आपल्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब त्यांच्यात शोधण्याचा प्रयत्न करतो.

5) अनुरूपतात्मक आणि विचलनात्मक संदर्भ समूह :=)

मर्टन म्हणतो की संदर्भ समूहाचे एक प्रकार्यात्मक महत्व आहे. संदर्भ समूहाचे प्रकार्यात्मक महत्व हे आहे की, तो व्यक्तीला आपल्यासोबत एकरूपता स्थापन करण्यास प्रेरित करतो. ज्यामुळे त्या व्यक्तीचा व्यवहार, आदर्श आणि मूल्य हे ती व्यक्ती सदस्य असलेल्या समूहाच्या मूल्य आदर्श आणि आचरणापेक्षा वेगळे असतात; परिणामत :

असमानता निर्माण होते. परंतु संदर्भ समूहाशी एकरूपता आणि आपल्या समूहाशी असमानता स्थापन करणे. त्या मर्यादेपर्यंत आवश्यक समजले जाईल. जोपर्यंत ते सामाजिक व्यवस्थेकरिता अपयात्मक नसेल परंतु हे बऱ्याच प्रमाणात या गोष्टीवर अवलंबून असते. कि त्याच्या अशा वर्तनामुळे आपल्या समूहाच्या निर्धारित मूल्यांना किती आघात होतो.

7) गैर सदस्यता समूह :-

मर्टनच्या मते हे आवश्यक नाही की कोणतीही व्यक्ती केवळ त्याच्या समूहाचा सदस्य असावा. तो ज्या समूहाचा सदस्य नाही. असा समूहाही देखील संदर्भ होऊ शकतो. ज्या समूहाचे आपण सदस्य नाही आणि ज्या समूहाच्या सदस्यांसोबत आपली कोणत्याही प्रकारची आंतरक्रिया नाही. असा समूह देखील आपल्या व्यवहार आदर्श आणि मूल्यांना प्रभावित करतो आणि त्यानुसार तो आपणाला घडवतो. असा गैरसदस्यता समूह देखील आपला संदर्भ समूह होतो.

Dr. P. S. Sonale
Hod Sociology